# क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविदयालय, कुंडल

## राष्ट्रीय सेवा योजना

## २०२१ - २२

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## मु. मोहिते वडगाव

## ता. कडेगाव

## जि. सांगली

## कार्यक्रम अधिकारी

## डॉ. डी.डी. खळदकर

# क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविदयालय, कुंडल

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

सन २०२१- २२ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन मोहिते वडगाव ता. कडेगाव जि. सांगली येथे दि. १९ मार्च २०२२ ते २५ मार्च २०२२ या कालावधीत संपन्न झाले. राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचा उद्‌घाटन समारंभ दि. १९ मार्च २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय येथे झाला. शिबिराचे उद्‌घाटन मा. जितेश भैया कदम यांच्या शुभहस्ते झाले तर समारंभाचे अध्यक्ष मा. किरण तात्या लाड हे होते. उद्‌घाटन समारंभास ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. विजय मोहिते, उपसरपंच, सर्व सदस्य, व विविध संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच महाविद्‌यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये राबविलेले उपक्रम**

- विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकानी संपूर्ण gram स्वच्छता करण्याचा उपक्रम हाती घेतला त्यामध्ये

सर्व सार्वजनिक ठिकाणे, स्मशानभूमी, गटारे, मंदिरे व रस्ते इ. ठिकाणांची स्वच्छता शिबिराच्या कालावधीत पूर्ण केली.

- २० मार्च २०२२ रोजी मोहिते वडगाव येथील स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली.
- २१ मार्च २०२२ रोजी मोहिते वडगाव येथील दफनभूमी व दलित वस्तीची स्वच्छता करण्यात आली.
- २२ मार्च २०२२ रोजी मोहिते वडगाव गावातील गटारींची स्वच्छता करून उत्तम आरोग्यासाठी जनजागृती करण्यात आली.
- २३ मार्च २०२२ रोजी मोहिते वडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे स्वच्छता करण्यात आली.
- २४ मार्च २०२२ रोजी मोहिते वडगाव येथील सर्व मंदिरे स्वच्छ करण्यात आली.
- गावामध्ये असणारे सर्व प्लास्टिक गोळा केले व त्याचे दुष्परिणाम यावर लोकांची जाणीव जागृती करण्यात्त आली.

## विशेष श्रम संस्कार शिबिर प्रबोधन

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये प्रबोधनमालेचे आयोजन करण्यात आले. दत्तक खेड्यामधील ग्रामस्थ तसेच स्वयंसेवक यांचे प्रबोधन व्हावे व त्यातून देशाचे सुजन नागरिक घडावे हा या आयोजनाचा हेतू होता. प्रस्तुत व्याख्यानमाले मध्ये श्री. ऋषिकेश खारगे यांचे दि. २० मार्च २०२२ रोजी “ऐशी कळवल्याची जाती” या विषयावर व्याख्यान झाले. दि. २१ मार्च २०२२ रोजी “पानिपत, मराठ्यांच्या पराक्रमाची गाथा ” या विषयावर डॉ. उल्हास माळकर यांचे व्याख्यान

झाले. दि. २२ मार्च २०२२ रोजी "युवकापुढील आव्हाने" या विषयावर श्री. संदीप पाटील यांचे व्याख्यान झाले. दि. २३ मार्च २०२२ रोजी "संताचे सामाजिक योगदान " या विषयावर डॉ. बापूराव पवार यांचे व्याख्यान झाले. दि. २४ मार्च २०२२ रोजी "कथाकथन " या विषयावर श्री. सर्जेराव खरात यांचे व्याख्यान झाले.

समारोप -

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप दि. २५ मार्च २०२२ रोजी सायंकाळी ४ वाजता करण्यात आला. त्यावेळी शिबिरात झालेल्या सर्व कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. समारोप कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा धनश्रीताई लाड होत्या तर मा. मालनताई मोहिते ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या. समारंभास ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. विजय मोहिते, उपसरपंच, सर्व सदस्य, व विविध संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष मा. किरण तात्या लाड




मा. प्राचार्य डॉ. पी. बी लाड मनोगत व्यक्त करताना




डॉ. उल्हास माळकर यांचे व्याख्यान




श्री. सर्जेराव खरात यांचे व्याख्यान



**विशेष श्रम संस्कार शिबिर श्रमदान**




**विशेष श्रम संस्कार शिबिर श्रमदान**



**विशेष श्रम संस्कार शिबिर श्रमदान**



**विशेष श्रम संस्कार शिबिर श्रमदान**

दै. तरुण भारत २७/३/२२

# श्रमसंस्कार शिबिरातून पिढी घडविण्याचे काम : जितेश कदम



**कुंडल : उद्घाटनप्रसंगी बोलताना जितेश कदम यावेळी किरण लाड, सौ. मालनताई मोहिते, विजय मोहिते, प्राचार्य डॉ. प्रताप लाड आदी.**

वार्ताहर
कुंडल

आजच्या काळात युवा पिढीसाठी राष्ट्रीय सेवा योजनांची श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची आहेत कारण या माध्यमातून पिढी घडविण्याचे काम होत असल्याचे मत जितेश कदम यांनी व्यक्त केले. ते मोहिते वडगांव (ता.कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी क्रांती दुध संघाचे चेअरमन किरण लाड, जि. प. माजी अध्यक्षा सौ. मालनताई मोहिते, मो. वडगावचे सरपंच विजय मोहिते, रानकवी, सु. धो. मोहिते, प्राचार्य डॉ. प्रताप लाड, कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय खळदकर, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ, धनंजय होनमाने आदी उपस्थित होते.

जितेश कदम पुढे म्हणाले सोशलमिडीया मुळे युवापिढीला सर्व काही फास्ट झाले पाहिजे अस वाटायला लागलय, कोरोनाच्या दोन वर्षाच्या काळात विशेषतः युवा पिढी वास्तवापासून दुर जाऊन सोशल मिडीयामुळे आभासी दुनियेत वावरायला लागली मात्र आभासी दुनियेतून बाहेर पडण्यासाठी विशेष श्रमसंस्कार शिबिर चांगले माध्यम असल्याचे सांगुन सद्यस्थितिला अशा शिबिरांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील खेड्यामध्ये येऊन श्रमदान करताना मी काहीही करु शकतो हे जेंव्हा तरुणाईच्या मनात खोलवर रुजेल तेंव्हाच ही युवापिढी खऱ्या अर्थाने सक्षम होईल.

किरण लाड म्हणाले कोरोना काळात सर्वसामान्याच्या हातातुन शिक्षण सुटून जातय की काय अस वाटायला लागल ऑनलाईनमुळे खुप अडचणी निर्माण झाल्या मात्र आता परिस्थिती पुर्वपदावर येत आहे मोहिते वडगावमध्ये आमच्या महाविद्यालयाचे शिबिर दरवर्षी आयोजित केले जाते ते इथल्या लोकांच्या प्रेमामुळे सरपंच विजय मोहिते व त्यांची सर्व टीम आमच्या शिबीरार्थींना सहकार्य करते. सरपंच विजय मोहिते म्हणाले कोरोना बरेच काही शिकवून गेला. एन.एस.एसच्या विद्यार्थ्यांची जबाबदारी गावाची आहे. श्रमसंस्कार हे या शिबिरातुन शिकायचे असते. प्रास्ताविक प्राचार्य. डॉ. प्रताप लाड, यांनी केले सु.धो. मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले.

# श्रमसंस्कारातील जिव्हाळा हृदयात ठेवा : खरात

दै. सकाळ 29/3/22

**सकाळ वृत्तसेवा**

देवराष्ट्रे, ता. २८ : श्रमसंस्कार शिबिरातील काम आयुष्याला कलाटणी देणारे असते. यातून विद्यार्थी घडत असतो. त्यामुळे श्रमसंस्कारातील जिव्हाळा हृदयाच्या कुपीत ठेवा, असे प्रतिपादन ग्रामीण कथाकथनकार प्रा. सर्जेराव खरात यांनी केले. ते मोहित्यांचे वडगाव येथे बोलत होते.

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते.




**देवराष्ट्रे : मोहित्यांचे वडगाव येथील श्रमसंस्कार शिबिरात बोलताना सर्जेराव खरात.**

श्रमसंस्कार शिबिरात मोहित्यांचे वडगाव येथील समशान भूमी, नाले स्वच्छता, अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत समोरील परिसर स्वच्छता, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वृक्षारोपण केले. तसेच गावच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवत सामाजिक विषयावर जनजागृती करण्यात आली.

शिबिराच्या समारोपावेळी धनश्रीताई लाड, प्राचार्य प्रताप लाड, मालनताई मोहिते, पूजा लाड ग्रामपंचायत सदस्या धनश्री कुंभार, प्रा. डॉ. दत्तात्रय खळदकर, प्रा. डॉ. जगन्नाथ पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अनिकेत थोरबोले यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा घोरपडे यांनी केले.

# संस्काराची धार कायम राहण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरे कारणीभूत ठरतात : सौ.लाड

**जनप्रवास । वार्ताहर**

**कुंडल :** देशाचे सुजान नागरीक बनण्यासाठी संस्कारांची गरज असते अन् संस्काराची धार कायम राहण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरे कारणीभुत ठरतात असे प्रतिपादन क्रांती महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.धनश्रीताई लाड यांनी केले. त्या मोहिते वडगाव (कडेगाव) येथे क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सुरु असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभ प्रसंगी बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. मालनताई मोहिते, सरपंच विजयभाऊ मोहिते, शिवाजी विद्यापिठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.अभय जायभाये, तालुका समन्वयक प्रा.डॉ.सुभाष चवरे, राष्ट्रवादी जिल्हा युवती अध्यक्षा कु.पुजा लाड, कडेगाव तालुका राष्ट्रवादी महिला अध्यक्षा व ग्रामपंचायत सदस्या सौ.वैशालीताई मोहिते, प्राचार्य डॉ. प्रताप लाड, समन्वयक प्रा.डॉ. दत्तात्रय खळदकर आदी मान्यवर उपस्थित होते.



**मोहिते वडगाव (ता.कडेगाव) येथे आयोजित क्रांतिअग्रणी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना सौ. धनश्रीताई लाड. यावेळी उपस्थित माजी.जि.प. अध्यक्षा सौ. मालनताई मोहिते, प्रा. अभय जायभाये, प्राचार्य डॉ.प्रताप लाड, पुजा लाड, सौ.वैशालीताई मोहिते, डॉ. दत्तात्रय खळदकर आदी.**

धनश्रीताई पुढे म्हणाल्या शिबिरामुळे शिक्षणानंतरची जबाबदारी काय आहे ते समजते. अन् शैक्षणिक काळापासून जर मुलांना श्रमाचे महत्त्व समजले तर ते आयुष्यात यशस्वी होतील. दुःख जाणून घेणे,एकमेकांना मदत करणे, हे यातून शिकण्यास मिळते.अध्यात्मामध्ये सेवाभाव खुप महत्वाचा आहे. श्रमाचे महत्वही शिबिराच्या माध्यमातून समजते. स्व. बापूसाहेबांच्या कर्तृत्वाचा वारसा लाभलेल्या आम्हा कुटुंबियांकडून शिबीरासाठी मदत करु असे धनश्रीताईंनी सांगून सुजान नागरीक दुसऱ्यासाठी नाही तर स्वतःसाठी बना सेवाभाव जागृत केल्यास सुजान नागरीक बनता येत असे ते शेवटी सांगितले.

सौ . मालनताई मोहिते म्हणाल्या आपण कष्ट करतो तेव्हा मायेने हात फिरविणारे असल्यानंतर उमेद वाढते शिक्षण हे नोकरीसाठी नाही तर जगण्यासाठी गरजेचे असून प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन जो काम करतो तोच खरा माणूस. राजकारणामध्ये खुप काम करण्यासाठी असते , फक्त संधीचे सोने करण्याची धमक आपण ठेवावी लागते याचे उदा. माझ्याच काळातील आहे. कारण अधिकारी व पदाधिकारी जेव्हा एकत्र येतात तेव्हा जिल्ह्याचा विकास होतो हे मल्लिनाथ कलशेट्टी व माझ्या काळात आम्ही सिद्ध केले. स्व. बापुसाहेब व स्व. पतंगराव कदम यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. कदम साहेबांचे कुंडलशी अन बापूसाहेबांचे मोहिते वडगावशी असलेले जिव्हाळ्याचे नाते किरण तात्या व आम्ही जपत आहोत. अन् हा वारसा दरवर्षी महाविद्यालयाचे शिबिर येथे आयोजित करुन आपणही जपला आहात.

विजय मोहिते म्हणाले , कुंडल व वडगावचे नाते पुर्वीपासूनचे नाते आहे, समाजासाठी कार्यरत असणारे डॉ. कदम साहेब, जी.डी.बापू लाड यांचा वारसा या परिसराला लाभला आहे. कोरोनाचा सर्वात मोठा आघात शिक्षणावर झाल्याने कोलमडलेली शिक्षण व्यवस्था उभी करणे हे काम आता करावे लागेल.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी चांगले काम केले आहे. शिबीरामुळे श्रमाचे संस्कार होतात कामाची सवय लागते. शिबिरामुळे विद्यार्थ्यांना खुप काही शिकावयास मिळते. आमच्या ग्रामपंचायतीला मिळालेल्या पुरस्कारा मध्ये महाविद्यालयाचे योगदान मोठे आहे. ग्रामपंचायत व महाविद्यालय यांचे नाते अतुट आहे. हे नाते वेगळ्या दृष्टीने टिकवायचे आहे.

प्रा.अभय जायभाये म्हणाले महिलांची व मुलींची या ठिकाणी असलेली उपस्थिती यावरुनच या परीसरामध्ये महिलांचे नेतृत्व रुजलेले आहे, हे दिसते . शिबिरातील युवकच पुढे समाजाचे नेतृत्व करण्यास सक्षम होतात. यावेळी शिबिरार्थ्यांना अन्नदान केलेल्या मान्यवरांचा, गटप्रमुखांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ.प्रताप लाड, कु.पुजा लाड यांनीही मनोगत व्यक्त केले. सागर कानुगडे, अमृता वरुडे,मेघा ढोकळे, अनिकेत लाड, यांनीही आपले अनुभव कथन केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा.डॉ.धनंजय होनमाने, सुत्रसंचलन सौ.प्रा.स्वप्नाली लाड यांनी तर आभार डॉ. दत्तात्रय खळदकर यांनी मानले. यावेळी शिबिरार्थी, महिला, सर्व शिक्षक उपस्थित होते.